मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१४ वा ● शनिवार, ता. ७ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय पक्षाचाच

## राष्ट्रीय अध्यक्षपद सुनेत्रा पवार त्यांनीच सांभाळावे - भुजबळ


**मुंबई । रयत समाचार**

सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय हा एखाद्या व्यक्तीचा नसून संपूर्ण पक्षाचा आहे. तसेच त्यांनीच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही सांभाळावे, अशी भूमिका मंत्री छगन भुजबळ यांनी मांडली. भुजबळ म्हणाले की, सोमवार व मंगळवारी सुनेत्रा पवार मुंबईत येणार असून, ''राष्ट्रीय अध्यक्षपद तुम्हीच स्वीकारावे,'' अशी मागणी पक्षातील महिला पदाधिकारींसह अनेक नेते त्यांच्याकडे करणार आहेत. उपमुख्यमंत्री व पक्षनेते म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड ही पक्षाच्या सामूहिक निर्णयातून झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामागे केवळ सुनील तटकरे यांचा एकतर्फी निर्णय नव्हता, असा खुलासाही भुजबळ यांनी केला.

''राजकारणात बदल होत असतात. मुख्यमंत्री, पंतप्रधान, महापौर बदलतात. निवडून आलेल्या लोकांकडे पुरावे असतात. त्यामुळे या विषयावर विनाकारण संशय निर्माण करू नये,'' असे त्यांनी सांगितले. दरम्यान, २८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर राज्यभर शोककळा पसरली होती.

२९ जानेवारीला बारामती येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर उपमुख्यमंत्रीपदासाठी चर्चा सुरू झाल्या होत्या. ३१ जानेवारी रोजी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर काही नेत्यांनी घाईबाबत टीका केली होती. तसेच या शपथविधीपूर्वी शरद पवार यांच्या पक्षाशी चर्चा न झाल्याने पवार कुटुंबात आणि पक्षात नाराजी असल्याच्या चर्चांनाही उधाण आले होते.

मात्र, भुजबळ यांच्या वक्तव्यामुळे पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट झाली आहे.




# भारत-मलेशिया संबंधांना नवे बळ

## मोदींचा ७-८ फेब्रुवारीला मलेशिया दौरा

**नवी दिल्ली । रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आणि उद्या (७ व ८ फेब्रुवारी) रोजी मलेशियाच्या दौऱ्यावर जाणार असून, मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणावर हा दौरा होत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने ही माहिती दिली. या दौऱ्यात भारतमलेशिया दरम्यानच्या व्यापक धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतला जाणार आहे. २०१५ मध्ये पंतप्रधान मोदी यांनी मलेशियाला शेवटचा दौरा केला होता. त्यावेळी दोन्ही देशांमधील संबंधांना 'एन्हान्स्ड स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'चा दर्जा देण्यात आला होता. त्यानंतर ऑगस्ट २०२४ मध्ये अन्वर इब्राहिम यांच्या भारत भेटीदरम्यान संबंध अधिक मजबूत करत Comprehensive Strategic Partnership जाहीर करण्यात आली होती.



या दौऱ्यात दोन्ही नेते व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, सेमीकंडक्टर, डिजिटल तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेणार आहेत. तसेच भारतमलेशिया व्यापक आर्थिक सहकार्य कराराच्या (CECA) पुनरावलोकनावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. क्वालालंपूर येथे या दौऱ्यादरम्यान भारतमलेशिया सीईओ फोरमची दहावी बैठक होणार असून, पंतप्रधान मोदी मलेशियातील आघाडीच्या उद्योगपतींशी संवाद साधणार आहेत. यामुळे दोन्ही देशांमधील व्यावसायिक व गुंतवणूक संबंधांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. मलेशियामध्ये सुमारे २९ लाख भारतीय वंशाचे नागरिक वास्तव्यास असून, पंतप्रधान मोदी या भारतीय समुदायालाही संबोधित करणार आहेत. या दौऱ्यामुळे भारताचे आसियान देशांशी असलेले संबंध अधिक मजबूत होणार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम

### महागाई नियंत्रणात असल्याचे RBI चे संकेत

**मुंबई । रयत समाचार**



देशाच्या आर्थिक परिस्थितीबाबत सकारात्मक चित्र असूनही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) शुक्रवारी झालेल्या चलनविषयक धोरण बैठकीत रेपो दरात कोणताही बदल न करता तो ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय अपेक्षेनुसार असून, चलनविषयक धोरण समितीने एकमताने तो घेतला. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मागील धोरण बैठकीनंतर जागतिक पातळीवरील आव्हाने वाढली असली, तरी अमेरिका आणि युरोपसोबत झालेले व्यापार करार भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक ठरणार आहेत. त्यामुळे सध्या व्याजदर कायम ठेवणे योग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरबीआयने आपली चलनविषयक भूमिका 'न्यूट्रल'च कायम ठेवली आहे. याचा अर्थ, येत्या काळात व्याजदर कमी किंवा वाढवण्याबाबत कोणताही तातडीचा संकेत देण्यात आलेला नाही. गव्हर्नर मल्होत्रा यांनी सांगितले की, महागाई सध्या नियंत्रणात असून सौम्य पातळीवर आहे, त्यामुळे पुढील निर्णय हे आर्थिक वाढ आणि महागाईच्या आकडेवारीवर अवलंबून असतील. फेब्रुवारी २०२५ पासून आतापर्यंत रिझर्व्ह बँकेने एकूण १२५ बेसिस पॉइंट्सनी व्याजदर कपात केली असून, डिसेंबर २०२५ मध्ये शेवटची २५ बेसिस पॉइंट्सची कपात करण्यात आली होती. सध्याचा हा टप्पा म्हणजे दरकपात चक्राला तात्पुरती विश्रांती असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. देशाची अर्थव्यवस्था सध्या मजबूत स्थितीत असून देशांतर्गत मागणी, पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्च आणि सेवा क्षेत्राची ताकद यामुळे भारत जगातील वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक राहिला आहे. चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर ७.४ टक्के राहील, असा अंदाज असून पुढील वर्षासाठी तो ६.८ ते ७.२ टक्क्यांच्या दरम्यान राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महागाईच्या बाबतीत, चालू आर्थिक वर्षात सरासरी महागाई सुमारे २ टक्के राहण्याची शक्यता असून ती आरबीआयच्या ४ टक्के उद्दिष्टापेक्षा कमी आहे. डिसेंबरमध्ये किरकोळ महागाई दर १.३३ टक्के इतका नोंदवण्यात आला होता. दरम्यान, रिझर्व्ह बँकेने कोणतीही अतिरिक्त तरलता उपाययोजना जाहीर न केल्यामुळे १० वर्षांच्या सरकारी रोख्यांच्या उत्पन्नात वाढ झाली, तर रुपया किंचित घसरला. शेअर बाजार मात्र सुरुवातीचे नुकसान भरून काढत स्थिरावला. भविष्यातील धोरणाबाबत बोलताना गव्हर्नर मल्होत्रा यांनी भू-राजकीय तणाव, ऊर्जेच्या किमतींतील चढउतार आणि हवामानातील अनिश्चितता ही महागाईसाठी धोका ठरू शकतात, असा इशारा दिला. मात्र, बाजारातील स्थिरता राखण्यासाठी रिझर्व्ह बँक तरलतेचे सक्रिय व्यवस्थापन करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ब्रिटिशकालीन पोलिस वसाहतीतील साहित्य गायब

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहरातील पोलिस स्टेशनच्या पश्चिम बाजूस असलेल्या ब्रिटिशकालीन पोलिस वसाहतीतील इमारतीमधून कोणतीही शासकीय परवानगी न घेता साहित्य काढून नेऊन गायब केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष घनश्याम प्रतापराव शेलार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अहमदनगर जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले असून, संबंधित इमारत शासकीय मालकीची असतानाही तिची तोडफोड करून बांधकाम साहित्य गायब करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शासनाच्या मालमत्तेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता विल्हेवाट लावणे हा गंभीर प्रकार असून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या घटनेमुळे शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून जबाबदार अधिकाऱ्यांची उत्तरदायित्व निश्चित करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शेलार यांनी केली आहे. या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## मराठा इतिहास आणि कष्टकऱ्यांचा आवाज हरपला

# अजित पवारांना नगरमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली

**नगर । रयत समाचार**

मराठा इतिहास, शेतकरी, विद्यार्थी आणि कष्टकरी घटकांना न्याय देणारे नेते म्हणून अजित पवार यांचे कार्य कायम स्मरणात राहील, असे प्रतिपादन नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी केले. स्मायलिंग अस्मिता कष्टकरी विद्यार्थी संघटना व स्मारक समितीच्या वतीने आयोजित अजित पवार यांच्या शोकसभेत ते बोलत होते. जगताप म्हणाले की, डिसेंबर २०२३ रोजी नागपूर अधिवेशनात अजित पवार यांनी स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या कार्यासाठी आजवरचा सर्वाधिक ८० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. उद्घाटनप्रसंगी उर्वरित कामासाठीही भरीव निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. चौथे छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास नव्या पिढीला प्रेरणा देईल आणि हे स्मारक देशातील पहिले 'पायलट प्रोजेक्ट' ठरेल, असा विश्वास त्यांनी त्या वेळी व्यक्त केला होता, अशी आठवण जगताप यांनी करून दिली.



''रोखठोक बोलणाऱ्या दादांमुळे नगरचा चेहरा-मोहरा बदलला. आता या स्मारकाच्या विकासाची जबाबदारी माझ्यावर आली असून ती मी पूर्ण करणार आहे. हीच इतिहासप्रेमींकडून अजित पवारांना खरी श्रद्धांजली ठरेल,'' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ही श्रद्धांजली सभा विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या इमारत प्रांगणात पार पडली. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल भावूक झाले. ''आम्ही अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील मुलं असलो तरी दादांनी आम्हाला नेहमी जपलं. मराठा आरक्षण आणि इतिहासाच्या लढ्यात ते कायम सोबत उभे राहिले,'' असे सांगत ६० लाखांचा निधी कसा ८० लाखांपर्यंत वाढला, याचा किस्साही त्यांनी सांगितला. मराठ्यांचं मोठं नेतृत्व हरपल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. कर्करोगतज्ज्ञ डॉ. सतीश सोनावणे यांनी शेतकरी आंदोलनात जखमी झालेल्या शेतकऱ्यांची अजित पवारांनी घेतलेली काळजी सांगितली. नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी सहकार व शेती क्षेत्रातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

दरम्यान, जिजाबाई शिक्षण संस्थेच्या नंदा पांडुळे, जिजाऊ ब्रिगेडच्या संपूर्णा सावंत, रयत शिक्षण संस्थेचे ज्ञानदेव पांडुळे, प्रकाश कराळे, संजय गाडे, प्राचार्य बाळासाहेब सागडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. अजित पवारांच्या आठवणी जपण्यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कलादालनास त्यांच्या नावाने नामकरण करण्यात येणार असल्याची माहिती स्मारक समितीचे सचिव रिनुल नागवडे यांनी दिली. ''अजित पवार कामाला प्रथम प्राधान्य देत,'' या विचारातून शोकसभेनंतर उपस्थितांनी स्मारक समितीच्या बांधकामात प्रत्यक्ष विटा लावून श्रमदान केले. यावेळी संग्राम जगताप यांच्या हस्ते चाफ्याचे झाड लावण्यात आले. ''पानगळ झाली तरी चाफ्याला फुलं येतात, त्याचप्रमाणे अजित दादा गेले असले तरी त्यांचे कार्य कायम दिसत राहील,'' असे खजिनदार शुभम पांडुळे यांनी सांगितले. या शोकसभेला तुषार सोनवणे, प्रा. अशोक घोरपडे, विनीत गाडे, अजय आगवान, विकी रोहोकले, धिरज कुमटकर यांच्यासह उद्योजक, इतिहासप्रेमी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापौरपदी ज्योती अमोल गाडे, उपमहापौरपदी धनंजय जाधव बिनविरोध

## राष्ट्रवादीभाजप समीकरणाची झलक; महापालिकेत नवे नेतृत्व

**अहिल्यानगर । तुषार सोनवणे**

अहिल्यानगर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत महापौर व उपमहापौर पदांची निवड प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. या निवडणुकीत महापौरपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्योतीताई अमोल गाडे, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे धनंजय कृष्णा जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

महापौर पदासाठी सूचक म्हणून नगरसेवक गणेश भोसले व अनुमोदन नगरसेवक अविनाश घुले यांनी प्रस्ताव मांडला. उपमहापौर पदासाठी सूचक निखिल वारे व अनुमोदन कुमार वाकळे यांनी प्रस्ताव सादर केला. संपूर्ण निवड प्रक्रिया शांततेत व उत्साही वातावरणात पार पडली. या वेळी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, नगरसचिव मेहर लहारे, तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत महापालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम केल्यास शहराच्या विकासाला गती मिळेल, असे मत व्यक्त केले. पार्किंग व वाहतूक व्यवस्थेचे प्रश्न गंभीर असून त्यावर जिल्हा प्रशासन, आरटीओ व महानगरपालिका यांनी संयुक्त उपाययोजना राबवाव्यात, असे त्यांनी सांगितले. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार अनधिकृत होर्डिंग्ज व बॅनर्स हटविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. नूतन महापौर ज्योतीताई गाडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवण्यात येईल, असे सांगितले. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू तसेच अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्शावर आधारित विकास आराखडा उभा करू, अशी भूमिका त्यांनी मांडली. उपमहापौर धनंजय जाधव यांनी महापौर व सर्व नगरसेवकांसह शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. लोकाभिमुख निर्णय घेत नगरकरांची सेवा करणे हीच प्राथमिकता असेल, असे त्यांनी स्पष्ट केले. सभागृहाच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली.





### विकासाला गती देण्याचा निर्धार

**जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना**

- * वाहतूक व पार्किंग समस्यांवर तातडीचे उपाय
- * अनधिकृत होर्डिंग्ज व बॅनर्स हटविणे
- * प्रशासन व लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय
- * नागरिकांचा विश्वास संपादन करणारे काम

**निवड प्रक्रियेची माहिती**

**महापौर :** ज्योतीताई अमोल गाडे (राष्ट्रवादी काँग्रेस)

**उपमहापौर :** धनंजय कृष्णा जाधव (भाजप)

**अध्यक्ष :** डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी

**निवड पद्धत :** बिनविरोध

**नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा निर्धार**

महापौर ज्योतीताई गाडे यांनी शहरातील मूलभूत समस्या सोडवण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. उपमहापौर धनंजय जाधव यांनी सर्वपक्षीय समन्वयातून लोकाभिमुख विकासाची दिशा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

अहिल्यानगर महानगरपालिकेत महापौर राष्ट्रवादी काँग्रेस व उपमहापौर भाजपकडे गेल्याने स्थानिक पातळीवर नवे राजकीय समीकरण स्पष्ट झाले आहे. आगामी काळात विकास कामांमध्ये सहकार्याची भूमिका दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सत्ताधारी व विरोधी पक्षांमधील समन्वय टिकल्यास महापालिकेच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळू शकते, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी 'साऊ' समितीचा सन्मान

## मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते कृषी पर्व महोत्सवात गौरव

**अहिल्यानगर । सलीमखान पठाण**

अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभरात एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'साऊ' एकल महिला समितीचे राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे यांच्यासह समितीचा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. केडगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी महोत्सव 'कृषी पर्व' आणि साईसरस प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात हा सन्मान करण्यात आला. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा कृषी व पशुसंवर्धन विभाग, आत्मा तसेच एक्स्पो इंडियन ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त



विद्यमाने कृषी पर्व महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान (उमेद) आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या पुढाकारातून जिल्हास्तरीय स्वयंसहायता बचतगटांच्या उत्पादन व विक्रीचे साईसरस प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते साऊ एकल महिला समितीचा गौरव करण्यात आला. समितीचे राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे, जिल्हा समन्वयक अशोक कुटे, तालुका समन्वयक प्रतिमा कुलकर्णी (अकोले), प्रकाश इथापे (नगर), उज्ज्वला शेळके (जामखेड) व जयश्री कुटे यांनी पालकमंत्र्यांकडून प्रशस्तीपत्र स्वीकारले. अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने हे प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात महिला सक्षमीकरण अभियान राबविण्यात येत असून साऊ एकल महिला समितीच्या माध्यमातून राज्यभरात विविध स्तरांवर सक्षमीकरणाचे उपक्रम राबविले जात आहेत. या कार्याची दखल घेऊन समितीला सन्मानित करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. या वेळी आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, स्वामी विज्ञानानंद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उमेदचे व्यवस्थापक सोमनाथ जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

# महाशिवरात्रीनिमित्त फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

## ९ ते १६ फेब्रुवारीदरम्यान धार्मिक कार्यक्रम

**नगर । रयत समाचार**

महाशिवरात्रीनिमित्त बुरुडगाव रोडवरील फुलसौंदर मळा येथील शिवपंचायतन मंदिराच्या प्रांगणात सालाबादाप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्री उत्सवाचे हे २७ वे वर्ष असून दि. ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रथम महापौर भगवानराव फुलसौंदर यांनी दिली. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ८ ते ९ विष्णुसहस्त्रनाम पठण तसेच सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. सप्ताहात विविध कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. दि. ९ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज चांदर (आळंदी), दि. १० रोजी ह.भ.प. गोसेवक ज्ञानेश्वर माऊली कदम (भामचंद्र), दि. ११ रोजी ह.भ.प. महंत हरिश्चरणजी गिरी (कोपरगाव), दि. १२ रोजी ह.भ.प. डॉ. राधाकिसन महाराज अकोलकर (पैठण), दि. १३ रोजी ह.भ.प. पुंडलिक महाराज जंगले शास्त्री (डोंगरगण) व श्री लक्ष्मण महाराज कदम, दि. १४ रोजी ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी), दि. १५ रोजी ह.भ.प. वासुदेव महाराज खेडकर (अहिल्यानगर) यांचे सायंकाळी ८ ते १०.३० या वेळेत कीर्तन होणार आहे. तसेच दि. १६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. महंत बालयोगी अमोल महाराज जाधव (श्रीराम संस्थान, वाकोडी) यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२.३० या वेळेत होणार आहे. शिवपंचायतन मंदिर, फुलसौंदर मळा येथे आयोजित या कार्यक्रमाचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, दिलीप माडगे, राजू फुलसौंदर, भास्कर गायकवाड, अनिल साळुंके, नाना इंगवले, छोटू शिंदे, अक्षय शिंगणे, दिपक फुलसौंदर, गणेश फुलसौंदर, सुनील फुलसौंदर व अवधूत फुलसौंदर यांनी केले आहे.

# एमआयडीसीतील बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी

## कारवाई न झाल्यास शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा



**नगर । रयत समाचार**

शहराच्या औद्योगिक क्षेत्र असलेल्या एमआयडीसीतील एल ॲण्ड टी कंपनी परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षांची बेकायदेशीर कत्तल करण्यात आल्याचा गंभीर आरोप शिवसेना (एकनाथ शिंदे) सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी व उपवनसंरक्षक यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष (दक्षिण) विनोद साळवे यांनी केली आहे. एल ॲण्ड टी कंपनीच्या गेट क्रमांक ३ समोरील मुख्य रस्त्यालगत शेकडो झाडांची बेकायदेशीरपणे कत्तल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. वन विभागाची पूर्वपरवानगी न घेता कंपनीने स्वतः च्या सोयीसाठी, विशेषतः बेकायदेशीर पार्किंगसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. ही तोड केवळ फांद्यांपुरती मर्यादित नसून झाडांच्या खोडापर्यंत करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी महत्त्वाची असलेली झाडे अशा प्रकारे तोडणे हे पर्यावरण संरक्षण नियमांचे उल्लंघन असल्याचे शिवसेना सामाजिक न्याय विभागाने म्हटले आहे. एमआयडीसी कार्यालयाच्या अगदी जवळच हा प्रकार घडूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने संबंधित विभागांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या वृक्षतोड प्रकरणी संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# अहमदनगर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**नगर । रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर व अहमदनगर महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते २०२५ पर्यंत शिक्षण घेतलेल्या सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन माजी विद्यार्थी संस्थेचे सचिव डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी केले आहे.

या स्नेहमेळाव्याचे उद्घाटन दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. रजनीश बार्नबस यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनानंतर माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन, जुन्या आठवणींना उजाळा देणारा संवाद, स्नेहभोजन तसेच विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध दृढ करण्यासाठी तसेच विविध पिढ्यांतील माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी हा स्नेहमेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमासाठी उपस्थिती नोंदवण्यासाठी : https://hosturl.info/1fcfkM या लिंकवर भेट देऊन नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा अविस्मरणीय ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,
दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत,आकाशवाणीसमोर, सावेडी,
अहिल्यानगर -४१४००३
जावक क्रमांक/४६७/२०२६
दि. ०५/०२/२०२६

### चौकशीची जाहीर नोटीस

**चौकशी अर्ज क्रमांक – ८५/२०२६**
**न्यासाचे नाव – ओम दत्त धर्म ट्रस्ट**
**न्यासाचा पत्ता –** साठे मळा, साईश्रध्दा ऑईल मिलजवळ, मु.पो. निमगाव जाळी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
**अर्जदार– कु. माधुरी राजेंद्र साठे**
**सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**अ) जंगम मिळकत – रोख रक्कम ५१,०००/– (रुपये एक्कावन्न हजार मात्र) अध्यक्षांकडे जमा.**
**ब) स्थावन मिळकत – (वर्णन) – काही नाही**
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल, त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल,व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
**ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दि. ०४/०२/२०२६ रोजी दिली.**

कोर्टाचा शिक्का

| **न्यायलिपीक** | **अधिक्षक** |
|---|---|
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर |

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,
दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत,आकाशवाणीसमोर, सावेडी,
अहिल्यानगर -४१४००३
जावक क्रमांक/४७१/२०२६
दि. ०५/०२/२०२६

### चौकशीची जाहीर नोटीस

**चौकशी अर्ज क्रमांक – ८९/२०२६**
**न्यासाचे नाव – श्री. नर्मदेश्वर संन्यासी आत्माराम गिरी ट्रस्ट**
**न्यासाचा पत्ता –** मु.पो. पिंप्री निर्मळ, ता. राहाता, जि. अहिल्यानगर
**अर्जदार– अशोक निवृत्ती निर्मळ उर्फ आत्माराम गिरी**
**सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**अ) जंगम मिळकत – रोख रक्कम ५१,०००/– (रुपये एक्कावन्न हजार मात्र) अध्यक्षांकडे जमा.**
**ब) स्थावन मिळकत – (वर्णन) – काही नाही**
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल, त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल,व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
**ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दि. ०४/०२/२०२६ रोजी दिली.**

कोर्टाचा शिक्का

| **न्यायलिपीक** | **अधिक्षक** |
|---|---|
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर |

# कृषी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद, दुसऱ्या दिवशी १.०७ कोटींची उलाढाल



**नगर । रयत समाचार**

कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व एक्स्पो इंडिया ओशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपुणे रोडवरील नेमाने इस्टेट येथे दि. ५ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ''कृषी पर्व'' कृषी महोत्सवास जिल्ह्यातील शेतकरी व ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देत कृषी उत्पादनांची खरेदी केली. शेतकरी व बचत गटांनी उत्पादित केलेले धान्य, फळे, भाजीपाला प्रक्रिया उत्पादने तसेच महिला बचत गटांचे पापड, शेवया, मसाले, लोणची आदी पदार्थांना ग्राहकांची विशेष पसंती मिळाली. अकोले येथून आणलेल्या इंद्रायणी, काळभात व जिराभात या तांदळांना ग्राहकांकडून मोठी मागणी दिसून आली. या महोत्सवात पारनेर तालुक्यातील काळकापूर येथील मशरूम उत्पादन मॉडेल प्रथमच सादर करण्यात आले असून थेट ग्राहकांना मशरूम विक्री हे प्रमुख आकर्षण ठरले आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची आतापर्यंत १ कोटी ७ लाख रुपयांची विक्रमी उलाढाल झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन मिळावे यासाठी शेतीमध्ये व चा वापर, भरडधान्य पिकातील संधी, कृषी गतीशीलतेमध्ये एफपीओची भूमिका, स्टार्टअप सादरीकरण व नेटवर्किंग या विषयांवर विविध चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित अवजारे, कंबाईन हार्वेस्टर तसेच सूक्ष्म सिंचन, संरक्षित शेती, जैवखते व कृषीपूरक व्यवसायांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या उमेद अभियानांतर्गत स्वयं-सहायता बचत गटांनी तयार केलेली उत्पादने तसेच पौष्टिक तृणधान्यांपासून बनविलेले गावरान खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. पशुसंवर्धन विभागामार्फत विविध जातींच्या जनावरांचे प्रदर्शन हेही महोत्सवाचे आकर्षण ठरत आहे. ''शेतकरी ते ग्राहक'' थेट विक्री साखळी निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित हा महोत्सव शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरत असल्याचे आयोजकांनी सांगितले.


रयत समाचार Classified

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# मातृआरोग्य योजनांचा बोजवारा?

## १४९ गरोदर महिलांच्या अभ्यासातून धक्कादायक वास्तव; लाभ वितरणातील अनियमितता समोर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

इकोनेट, पुणे संस्थेच्या वतीने लोणी व्यंकनाथ येथे मंगळवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रमात मातृआरोग्य योजनांतील गंभीर त्रुटी, लाभ वितरणातील अनियमितता तसेच आरोग्य केंद्रांतील पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था उघड झाली.



कार्यक्रमास विविध आरोग्य केंद्रांतील हक्कधारक महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. वंचित व दुर्बल घटकांच्या सन्मानार्थ समई प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समिती श्रीगोंदा येथील सहाय्यक गटविकास अधिकारी रणजित अकुलवार, कक्ष अधिकारी महेश थोरात, विस्तार अधिकारी मनोज बनकर व संदीप आल्हाट यांच्या उपस्थितीत झाले. पॅनालिस्ट म्हणून ॲड. महेंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता भोसले, दैनिक लोकमतचे पत्रकार बाळासाहेब काकडे, डॉ. सचिन जाधव व डॉ. शुभम भुजबळ उपस्थित होते.

कार्यक्रमात जननी सुरक्षा योजना व मातृत्व वंदना योजना अंतर्गत एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत १४९ गरोदर महिलांचा सखोल अभ्यास सादर करण्यात आला. परालिगल कार्यकर्ता संतोष भोसले यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे निष्कर्ष मांडले. मातृत्व वंदना योजनेत ३७ महिलांपैकी २० महिलांना पहिला हप्ता तर २३ महिलांना दुसरा हप्ता मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले. जननी सुरक्षा योजनेत ६८ महिलांपैकी तब्बल ६१ महिलांना लाभ मिळालेला नसल्याचे समोर आले. तसेच १४९ गरोदर महिलांपैकी केवळ २५ महिलांनाच सरकारी दवाखान्यातून मोफत सोनोग्राफी मिळाल्याचे स्पष्ट झाले.

अभ्यासादरम्यान आरोग्य केंद्रांतील पायाभूत सुविधांची अत्यंत खराब स्थितीही समोर आली. बेलवंडी उपकेंद्रात तुटलेल्या काचा, खराब बेसिन व अस्वच्छ स्वच्छतागृह आढळले. लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रात तुटलेले बेसिन पाईप, अस्वच्छ स्वच्छतागृहे व परिसरात कचरा दिसून आला. काष्टी येथे गंजलेल्या कात्री, लिंपणगाव येथे जाळ्या व जळमटे तसेच वापरात नसलेली स्वच्छतागृहे, तर राजापूर येथे मुदत संपलेली औषधे आढळल्याचे सांगण्यात आले. डॉक्टर व एएनएम यांच्यासाठी निवासस्थाने नसणे, गळती असलेले नळ व पावसाळ्यात गळणारी छते अशा समस्याही उपस्थित करण्यात आल्या.

या मुद्द्यांवर सखोल चर्चा करून प्रलंबित लाभ तात्काळ देणे, पायाभूत सुविधा दुरुस्त करणे, रिक्त पदे भरणे व औषध साठा वाढवणे याबाबत ठोस निर्णय घेण्यात आले. यासंदर्भातील लेखी प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती इकोनेट संस्थेच्या वतीने देण्यात आली.

# अहिल्यानगर उत्तर शिवसेनेत नवी संघटनात्मक बांधणी

**संगमनेर । रयत समाचार**



शिर्डी लोकसभा मतदारसंघांतर्गत शिवसेना (उबाठा) अहिल्यानगर उत्तर विभागातील नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या सत्कार व निर्धार बैठकीचे आयोजन शिर्डी येथे करण्यात आले आहे. शिवसेनेचे आक्रमक व धडाडीचे नेते अमर भाऊ कतारी यांची जिल्हा उपप्रमुख (उत्तर) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच इम्तियाज शेख यांची वाहतूक सेना जिल्हा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. याशिवाय संगमनेर तालुका प्रमुख (पूर्व) म्हणून भिमाशंकर पावसे, तर तालुका प्रमुख (पश्चिम) म्हणून भाऊसाहेब हासे यांची नियुक्ती झाली आहे. योगेश खेमनर यांची विधानसभा प्रमुख, फैसल सय्यद शहर प्रमुख (दक्षिण), अमित चव्हाण शहर प्रमुख (उत्तर), रंगनाथ फटांगरे उपजिल्हा संघटक, दीपक साळुंके विधानसभा संघटक, अमित फटांगरे मंडल प्रमुख (बोटा विभाग), प्रकाश गायकवाड मंडल प्रमुख (आश्वी विभाग), बाळासाहेब घोडके शहर समन्वयक, आसिफ तांबोळी शहर संघटक तसेच संजय फड तालुका संघटक म्हणून निवड झाली आहे. शिर्डी लोकसभा क्षेत्रातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार व निर्धार बैठक शनिवार दि. ७ रोजी दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा प्रमुख सचिन कोते व जिल्हा प्रमुख जगदीश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार असून जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# जिद्दीने गाठले यशाचे शिखर

## डॉ. आरती गवळी, आशिष गायकवाडांचा गौरव

**नगर । रयत समाचार**

एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या डॉ. आरती गवळी आणि एमपीएससी परीक्षेत यश मिळवत सहाय्यक संचालक (लेखा विभाग) वर्ग-एक अधिकारी पदावर निवड झालेल्या आशिष गायकवाड यांचा अहिल्यानगर बारा बलुतेदार महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या दोघांचे यश माळी समाजासाठी भूषणावह असल्याचे प्रतिपादन महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पोखर्डी येथील आरती गवळी यांनी एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण करून यश मिळवले, तर आशिष गायकवाड यांनी एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत वर्ग-एक अधिकारी पद मिळवले. या पार्श्वभूमीवर आयोजित सत्कार समारंभात डॉ. आरती गवळी यांचा सन्मान महिला जिल्हाध्यक्ष रोहिणी बनकर यांच्या हस्ते, तर आशिष गायकवाड यांचा सन्मान जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना माऊली गायकवाड यांनी ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये मोठी क्षमता असून योग्य मार्गदर्शन व आत्मविश्वास मिळाल्यास ते उच्च यश प्राप्त करू शकतात, असे सांगितले. जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर आरती गवळी व आशिष गायकवाड यांनी समाजासाठी आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शिक्षण व स्पर्धा परीक्षांमधील यश हे समाजाच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन असल्याचे सांगत अशा व्यक्तींचा सन्मान पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरतो, असे मत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना डॉ. आरती गवळी यांनी कुटुंबाचा आधार व समाजाचा विश्वास यामुळे हे यश मिळवता आले असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला न घाबरता शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. आशिष गायकवाड यांनी स्पर्धा परीक्षांचा प्रवास कठीण असला तरी सातत्य व संयम ठेवल्यास यश निश्चित मिळते, असे सांगत समाजासाठी काम करण्याची प्रेरणा या सन्मानातून मिळाल्याचे नमूद केले. या कार्यक्रमास महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल इवळे, जिल्हा सचिव मच्छिंद्र बनकर, प्रवक्ते विष्णू पाबळे, सहसचिव चंद्रकांत पुंड, नवनाथ खेडकर, राजहंस देसाई, ज्ञानेश्वर शिरसाठ, सुधीर पुंड, ज्ञानेश्वर कविटकर, भास्करराव चौधरी, बापूसाहेब फुंदे तसेच चांगदेव गवळी, शत्रुघ्न खरपुडे, राधाकृष्ण घुले, ज्ञानेश्वर दळवी, संतोष शेळके, किरण चव्हाण, रवी गायकवाड, राहुल शेंडे, बाळकृष्ण जाधव, नितीन रोकडे आदी उपस्थित होते.

# सपोनि अनिल मोरे यांनी स्वीकारला पदभार

## अवैध धंद्यांवर कारवाईची अपेक्षा

**सोनई । रयत समाचार**

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील पोलीस दलात तातडीने बदल्या केल्या असून त्यानुसार सोनई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून सहायक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी पदभार स्वीकारला आहे.



यापूर्वी सोनई पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक विजय माळी यांची राहुरी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. संगमनेर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले अनिल मोरे यांनी गुरुवार दि. ५ रोजी उशिरा रात्री विजय माळी यांच्याकडून पदभार स्वीकारला. विजय माळी यांच्या कार्यकाळात कॉलेज रोडवरील रोडरोमिओंवर कारवाई तसेच अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध कारवाया करण्यात आल्या होत्या. नवीन प्रभारी अधिकारी अनिल मोरे यांच्यासमोर सोनई परिसरात घडलेल्या प्रलंबित गुन्ह्यांचा तपास लावणे तसेच इतर व्यवसायांच्या आडून सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान असल्याचे सांगितले जात आहे. आगामी काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोरे कोणत्या पद्धतीने उपाययोजना करतात, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

# पारनेर तालुक्यात विटभट्ट्यांतील माती अवैध

## जीपीएस मोजणीसह फेर पंचनाम्याची मागणी

### शासनाची कोट्यवधींची रॉयल्टी बुडवल्याचा दावा

**पारनेर । रयत समाचार**

पारनेर तालुक्यातील काही विटभट्टी धारकांनी अत्यल्प रॉयल्टी भरून मोठ्या प्रमाणात माती साठविल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. तहसील कार्यालयातील काही तलाठी व मंडलाधिकाऱ्यांशी संगनमत करून हा प्रकार सुरू असल्याचा दावा करत जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करून सिव्हिल इंजिनिअर मार्फत फेर पंचनामा करून कडक दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नाशिक विभागीय आयुक्तांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.



निवेदनानुसार, पारनेर तहसील कार्यक्षेत्रातील अनेक विटभट्टी धारकांनी गेल्या वर्षभरात अत्यल्प रॉयल्टी भरून मोठ्या प्रमाणावर मातीचा साठा केला आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनंतर पाच महिन्यांनी वनकुटा, भाळवणी व पळशी परिसरातील मंडलाधिकाऱ्यांनी केवळ भरलेल्या रॉयल्टीइतकाच माती साठा दाखवून पंचनामा तयार केल्यामुळे शासनाची दिशाभूल झाल्याचा आरोप संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केला आहे. सन २०२६ मध्येही विटभट्टी धारकांकडून मोठ्या प्रमाणावर माती साठवणूक सुरू असून, पंचनाम्यासाठी अधिकारी विटा तयार होण्यास सुरुवात झाल्यानंतरच जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यावेळीही कमी प्रमाणात माती साठा दाखवून शासनाची मोठ्या प्रमाणात रॉयल्टी बुडवली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित विटभट्टी धारकांची संपूर्ण कागदपत्रे व तपासणी अहवाल तहसील कार्यालयास सादर न करता केवळ पंचनामे सादर केल्याने संशय अधिक बळावल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. तक्रारदारांनी अवैध माती साठ्याचा पंचनामा जीपीएस मोजणी व व्हिडिओ शूटिंगद्वारे, तसेच सिव्हिल इंजिनिअरची नियुक्ती करून करण्यात यावा, अशी मागणी केली होती. मात्र ती डावलून कमी प्रमाणात साठा दाखवणारे पंचनामे तयार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ मधील कलम ४८(७) व ४८(८) नुसार फेर तपासणी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ढवळपुरी गावातील के.के. रेंज हद्दीतून मोठ्या प्रमाणात अवैध माती उत्खनन करून इतर जिल्ह्यांत वाहतूक होत असल्याच्या प्रकाराचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# कोपरगावात ‘एक्स्पो’ची धूम

## २११ स्टॉल्ससह पाच दिवसीय महोत्सव

### विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आकर्षण

**कोपरगाव । किसन पवार**

लायन्स बिझनेस एक्स्पो, क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पो व सांस्कृतिक महोत्सव २०२६ याची भव्य सुरुवात दि. १२ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या हस्ते होणार आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात एकूण २११ विविध प्रकारचे स्टॉल्स उभारण्यात आले असून प्रॉपर्टी व बिल्डिंग मटेरियलसाठी स्वतंत्र डोम तयार करण्यात आला आहे. तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि बचत गटांसाठी मोफत स्टॉल्सची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती क्रेडाईचे अध्यक्ष राजेश ठोळे यांनी दिली. या वर्षी ‘‘उत्सव कोपरगावकरांचा भारतीय संस्कृतीचा’’ या संकल्पनेवर आधारित भारतातील सात आश्चर्य हे एक्स्पोचे मुख्य आकर्षण असणार आहे. एक्स्पोचे शीर्षक प्रायोजक म्हणून कर्मवीर शंकरराव काळे उद्योग समूह, प्रमुख प्रायोजक म्हणून संजीवनी उद्योग समूह व सम्राट वर्मा ग्रुप (येवला), तर सहप्रायोजक म्हणून गोदावरी दूध संघ व समता पतसंस्था यांनी सहभाग नोंदविल्याची माहिती सत्येन मुंदडा यांनी दिली. सांस्कृतिक महोत्सवांतर्गत दि. १२ फेब्रुवारी रोजी भारतातील विविध राज्यांच्या वेशभूषा व परंपरा दर्शविणारी लोकनृत्य रॅली होणार आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी ‘डान्स कोपरगाव डान्स’ (लहान गट) स्पर्धा प्रसिद्ध मराठी अभिनेत्री भाग्यश्री लिमये यांच्या उपस्थितीत होणार असून दि. १४ फेब्रुवारी रोजी मोठ्या गटाची डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. १५ फेब्रुवारी रोजी तुलसीदास आर. खुबानी ज्वेलर्स प्रस्तुत कॉमेडी नाटक स्पर्धा होणार असून रिल स्टार ऋषी हराळ व टीम उपस्थित राहणार आहेत. पारितोषिक वितरणासाठी अभिनेत्री स्पृहा जोशी विशेष उपस्थित राहणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध व सुंदर हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे. यंदाचे आणखी एक आकर्षण म्हणजे ‘पेट कार्निव्हल’ असून विविध प्रकारचे मासे, पक्षी व पाळीव प्राण्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. लायन्स क्लबच्या सामाजिक बांधिलकीतून मोफत नेत्र तपासणी, रक्तदान शिबिर व कॅन्सर जनजागृती कार्यक्रमही राबविण्यात येणार असल्याची माहिती सुमित भट्टड यांनी दिली. या उत्सवासाठी आमदार आशुतोष काळे, विवेक कोल्हे, राजेश परजने, काका कोयटे व सम्राट वर्मा यांचे सहकार्य लाभले आहे. आयोजनासाठी संदीप रोहमारे, संदीप कोयटे, सचिव संदीप राशिनकर, खजिनदार अक्षय बोरा, सचिन भंडकवाडे तसेच लायन्स, लीनेस, लिओ क्लब व क्रेडाईचे सदस्य परिश्रम घेत आहेत. कोपरगावकरांनी या पाच दिवसीय उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नेप्तीत शिवरी यमाई देवी मूर्ती स्थापनेनिमित्त मिरवणूक

## महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; फुगड्या, जयघोषांनी दुमदुमला परिसर

**नगर । रयत समाचार**

नगर तालुक्यातील नेप्ती गावात शिवरी यमाई मातेच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त भव्य व उत्साहपूर्ण मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यामुळे संपूर्ण गाव भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघाले होते. गावातून निघालेल्या मिरवणुकीच्या स्वागतासाठी ग्रामस्थांनी घराघरासमोर सडा-रांगोळी काढून देवीच्या आगमनाचे स्वागत केले.



शिवरी यमाई मातेची मूर्ती नगर येथे तयार करून विधीपूर्वक जेजुरी येथे कऱ्हा नदीत पवित्र स्नान घालण्यात आले. त्यानंतर जेजुरीच्या पायथ्याशी मूर्तीची पूजा करून श्री खंडोबांचे दर्शन घेण्यात आले. पुढे मूर्ती शिवरी येथील यमाई मातेच्या मंदिरात आणून अभिषेक करण्यात आला आणि त्यानंतर नेप्ती फाटा येथे आणण्यात आली. देवीचे भगत बाबासाहेब होले, माजी पंचायत समिती सदस्य देवा होले, सदाशिव भोळकर, नामदेव कानडे, बंडोपंत कांडेकर, संभाजी कांडेकर, भरत कांडेकर, सौरभ जपकर, पोपट कोल्हे, सोन्याबापू कानडे, विश्वनाथ होले तसेच सुहासिनी महिलांच्या हस्ते मूर्तीची पूजा करण्यात आली. सजवलेल्या रथात देवीची मूर्ती विराजमान करून वाजत-गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली. महिलांनी फुगड्या खेळत जयघोष करत उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. फटाक्यांच्या आतषबाजीत गावातील मुख्य चौकात मिरवणुकीचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी माजी सरपंच दिलीपराव होळकर, प्रा. एकनाथ होले, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, पोलीस पाटील अरुण होले, भानुदास फुले, प्रा. गोपीनाथ होले, जालिंदर होले, मल्हारी होले, सोमनाथ होले, शाहूराजे होले, गोविंद होले, छबुराव जपकर, बबन कांडेकर, प्रकाश कांडेकर, बाळासाहेब बेल्हेकर, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण कांडेकर, गोरख इंगोले, गोरख जपकर, सुदाम होळकर, रंगनाथ जपकर, लहानु गवारे, रामदास गवारे, संदीप कानडे, सिद्धांत कानडे, जमीर सय्यद, आनंदा कांडेकर, तुकाराम चौरे, राजू भोळकर, गणेश भोळकर, दिनेश भोळकर यांच्यासह पंचक्रोशीतून आलेले भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक वाजत-गाजत रानमळा येथील देवीच्या मंदिरात पोहोचली. तेथे धान्य निवास अर्पण करून दुसऱ्या दिवशी पुरोहितांच्या हस्ते देवी व कलशाची विधिवत पूजा व आरती करून मूर्तीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. मंदिराची आकर्षक रंगरंगोटी व विद्युत रोषणाईमुळे परिसर भक्तीमय वातावरणाने उजळून निघाला होता.

# USA विरुद्ध भारत सज्ज!

## अभिषेक-ईशान जोडीवर मोठी जबाबदारी




**नवी दिल्ली । रयत समाचार**

टी-२० विश्वचषक २०२६ मधील पहिल्या सामन्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला असून शनिवारी भारताचा सामना अमेरिकेविरुद्ध होणार आहे. अलीकडील कामगिरी पाहता टीम इंडियाचा आत्मविश्वास उंचावलेला असून या सामन्यात आक्रमक खेळाचीच अपेक्षा व्यक्त होत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत पाचपैकी चार सामने जिंकत भारताने आपली ताकद दाखवली होती.

त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वॉर्मअप सामन्यातही भारतीय संघाने विजय मिळवला. त्यामुळे विश्वचषकातील पहिल्या सामन्यात भारत विजयी सुरुवात करण्यास उत्सुक आहे. पहिल्यासामन्यासाठीभारताच्या प्लेइंग इलेव्हनकडे पाहिले असता सलामीला अभिषेक शर्मा आणि ईशान किशन ही जोडी मैदानात उतरण्याची दाट शक्यता आहे. वॉर्मअप सामन्यात या जोडीने प्रभावी फलंदाजी केल्यामुळे संजू सॅमसनला पहिल्या सामन्यात बाहेर बसावे लागू शकते. तिसऱ्या क्रमांकावर तिलक वर्मा, तर चौथ्या क्रमांकावर कर्णधार सूर्यकुमार यादव फलंदाजी करेल. त्यानंतर हार्दिक पांड्या, शिवम दुबे आणि रिंकू सिंग यांच्यावर मधल्या व शेवटच्या फळीत धावांची जबाबदारी असेल. अष्टपैलू म्हणून अक्षर पटेल संघात असेल. गोलंदाजी विभागात जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग आणि वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळणे जवळपास निश्चित मानले जात आहे. वॉशिंग्टन सुंदर पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याने त्याच्या खेळण्याबाबत साशंकता असून हर्षित राणा देखील पहिल्या सामन्याला मुकण्याची शक्यता आहे.

**अमेरिकेविरुद्ध भारताचा संभाव्य संघ :**

अभिषेक शर्मा, ईशान किशन, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव (कर्णधार), हार्दिक पांड्या, शिवम दुबे, रिंकू सिंग, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती.

# दिल्लीचं स्वप्न भंगलं, बंगळुरूचा इतिहास




**वडोदरा । रयत समाचार**

महिला प्रीमियर लीग २०२६ चा अंतिम सामना वडोदऱ्यातील बीसीए स्टेडियम (कोतांबी) येथे रंगला. या निर्णायक लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) महिलांनी दिल्ली कॅपिटल्सचा ६ विकेट्सने पराभव करत दुसऱ्यांदा WPL चं जेतेपद पटकावलं. कर्णधार स्मृती मानधना हिनं खेळलेली दमदार ८७ धावांची खेळी आरसीबीच्या विजयाची मुख्य ठरली. प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २०३ धावांचा डोंगर उभारला. महिला प्रीमियर लीगच्या अंतिम सामन्यातील ही आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरली. मात्र, एवढं मोठं लक्ष्यही आरसीबीच्या फलंदाजांनी आत्मविश्वासाने गाठलं. लक्ष्याचा पाठलाग करताना स्मृती मानधना आणि जॉर्जिया व्हॉल यांनी दिल्लीच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. व्हॉल हिनं ७९ धावांची खेळी करत कर्णधाराला भक्कम साथ दिली. या जोडीच्या जोरावर आरसीबीने ६ विकेट्स राखून सामना जिंकत विजेतेपदाची ट्रॉफी उंचावली. दिल्ली कॅपिटल्ससाठी हा सलग चौथा अंतिम सामना ठरला. मात्र यंदाही विजेतेपदाचं स्वप्न अपूर्णच राहिलं. महिला प्रीमियर लीगच्या चार हंगामांत आतापर्यंत मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांनी प्रत्येकी दोन वेळा जेतेपद पटकावलं आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना उत्साहपूर्ण प्रारंभ ; १५०० खेळाडूंचा सहभाग



**नगर । रयत समाचार**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक विकासासाठी क्रीडा स्पर्धांचे महत्त्वपूर्ण योगदान असून अशा स्पर्धांमधून भविष्यातील उत्कृष्ट खेळाडू व आदर्श नागरिक घडतात, असे प्रतिपादन प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी केले. जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या प्राथमिक शिक्षण विभागातर्फे आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन नेवासे तालुक्यातील त्रिमूर्तीनगर येथील दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील विद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमूर्ती क्रीडा संकुलात दोन दिवसांच्या जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांमधील सुमारे दीड हजार खेळाडू सहभागी झाले. उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुमती घाडगे पाटील, उपशिक्षणाधिकारी राजश्री घोडके, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, विस्ताराधिकारी विलास साठे, संजय कळमकर, भाऊसाहेब साठे, रवींद्र कापरे, जयश्री दिवटे, राधाकिसन शिंदे, प्राचार्य सोपान काळे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील केंद्रप्रमुख, क्रीडा शिक्षक, पंच, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कबड्डी सामन्याचे उद्घाटन शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या वतीने सलग चौथ्या वर्षी शाळास्तर, केंद्रस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तर अशा विविध स्तरांवर वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुकास्तरावरील विजेते खेळाडू व संघ जिल्हास्तरासाठी पात्र ठरले. दोन दिवस चालणाऱ्या स्पर्धांमध्ये ५० व १०० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, थाळीफेक, गोळाफेक तसेच खो-खो व कबड्डी या सांघिक स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांदरम्यान खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. स्पर्धांचे लाईव्ह प्रक्षेपण जिल्हा परिषदेच्या सोशल मीडिया व फेसबुक पेजवर तंत्रस्नेही शिक्षक बाबा पवार, अशोक पंडित व प्रकाश मुरकुटे यांनी केले. जिल्हाभरातून आलेल्या खेळाडू, शिक्षक, मार्गदर्शक व पंचांसाठी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या वतीने स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी समन्वयक राजेंद्र ठाणगे, भास्कर नरसाळे तसेच पंच मच्छिंद्र पटारे, गीताराम पवार, राजेंद्र मुंगसे, रामेश्वर चोपडे, दशरथ ढोले, सलीम शेख, सुनील नरसाळे, शकील बागवान, अंबादास गारूडकर, सुनील पवळे, दत्तात्रय वांढेकर आदींनी परिश्रम घेतले.

# हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला.



रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला.

मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# मेरा युवा भारत' क्रीडा स्पर्धांत युवकांचा जल्लोष

## विजेते जिल्हास्तरासाठी निवडले




**नगर ।रयत समाचार**

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या 'मेरा युवा भारत' उपक्रमांतर्गत आणि श्री नवनाथ युवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नगर तालुक्यातील निमगाव वाघा, चास व हिंगणगाव येथे तालुकास्तरीय विविध क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये शालेय विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, गोळा फेक, धावणे आदी मैदानी स्पर्धांनी परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. चास येथील श्री नृसिंह विद्यालयात झालेल्या स्पर्धांचे उद्घाटन उपशिक्षक विजय देवकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, आशिष आचारी, आप्पासाहेब कदम, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, दिपक ठाणगे आदींसह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. निमगाव वाघा येथील नवनाथ विद्यालयात आयोजित स्पर्धांचे उद्घाटन मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते झाले. हिंगणगाव येथील एव्हरेस्ट करिअर अकॅडमीमध्ये झालेल्या स्पर्धांचे उद्घाटन पोपट सोनवणे यांच्या हस्ते पार पडले. स्पर्धांदरम्यान खो-खो, कबड्डी, गोळा फेक व धावणे या प्रकारांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या. विजयी व उपविजयी संघ तसेच वैयक्तिक खेळाडूंना स्मृतीचिन्हे, मेडल व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेते संघ व खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. यावेळी बोलताना पै. नाना डोंगरे यांनी निरोगी व सुदृढ आयुष्यासाठी मैदानाकडे वळणे आवश्यक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या उपक्रमाचे आयोजन 'मेरा युवा भारत'चे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी रमेश गाडगे यांच्यासह आयोजक, शिक्षक व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# शहरात सातव्या राज्यस्तरीय मोफत माळी वधू-वर मेळाव्याचे आयोजन

## २२ मार्च रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात कार्यक्रम

**नगर । रयत समाचार**

शहरात सातव्या राज्यस्तरीय मोफत माळी वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून इच्छुकांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. रविवार दि. २२ मार्च रोजी टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, अहिल्यानगर येथे हा मेळावा होणार आहे. जय युवा अकॅडमी, जनवार्ता जीवनसाथी, क्रांतीज्योती बहुउद्देशीय संस्था, समृद्धी महिला बहुउद्देशीय संस्था, रयत प्रतिष्ठान व सावित्रीबाई फुले महिला संस्था यांच्या सहयोगाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य संयोजक पोपट बनकर, ॲड. महेश शिंदे, गणेश बनकर, स्वाती डोमकावळे व दिनेश शिंदे यांनी ही माहिती दिली. विवाह संस्था टिकविणे, शेतकरी कुटुंबातील युवक-युवतींचे विवाह जुळविणे तसेच फक्त शासकीय नोकरीच्या अट्टाहासाऐवजी उद्योजक, व्यावसायिक व स्वयंरोजगार करणाऱ्या युवकांनाही संधी देण्याबाबत प्राचार्य सिताराम जाधव, मंगलताई भुजबळ व तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. मागील वर्षी सामाजिक संस्था व जनवार्ता जीवनसाथीच्या माध्यमातून ४० हून अधिक विवाह जुळून आल्याची माहिती आयोजकांनी दिली. वधूसाठी कायमस्वरूपी मोफत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालकांच्या वाढत्या अपेक्षा आणि शिक्षण-करिअरच्या धावपळीत विवाह विषय गंभीर बनत असल्याच्या पार्श्वभूमीवर समाज बांधवांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. घटस्फोटित, विधवा, विदुर, सापत्य किंवा विना अपत्य अशा सर्वांसाठी मेळावा खुला असून इच्छुकांनी १ मार्चपर्यंत आपला बायोडाटा, आधार कार्ड व फोटोच्या तीन प्रतींसह ॲड. महेश शिंदे, पावन गणपती मंदिराजवळ, जुन्या कोर्टाच्या मागे, टांगे गल्ली येथे नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ९००४७२२३३० व ९९२१८१००९६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी सेवानिवृत्त प्राचार्य संजय पडोळे, रामेश्वर राऊत, संभाजीराव कोकाटे, जयश्री शिंदे, अश्विनी विधाते, स्वाती बनकर, नितीन डागवाले, बाळासाहेब पुंड, सचिन मेहेत्रे आदी परिश्रम घेत आहेत.

